पुढारी ८ सिंधुदुर्ग, रविवार, ७ ऑगस्ट २०२२



हळबे महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्रा. कौशिक शेटये.

# हळबे महाविद्यालयात हॉटेल मॅनेजमेंटमधील संधीविषयी मार्गदर्शन

**दोडामार्ग (पुढारी वृत्तसेवा) :** हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेतल्याने पंचतारांकित हॉटेल्स, कार्पोरेट सेक्टर, क्रूज लाईन, एअरलाइन कॅटरिंग, परदेशात नोकरी मिळते. तसेच गोव्यातील हॉटेल व्यवसाय पर्यटनामुळे तेजीत आले आहेत. त्यामुळे भविष्यात या क्षेत्राला चांगला वाव आहे आणि आपण याचा फायदा करून घेतला पाहिजे, असे मत प्रा. कौशिक शेटये यांनी व्यक्त केले. हळबे महाविद्यालयात हॉटेल मॅनेजमेंट अँड टुरिझमच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचा कार्यक्रम पार पडला. या विभागाचे प्रमुख प्रा. कौशिक शेटये यांनी हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रातील करियर बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, डॉ. एस.एन. खडपकर, प्रा. आशिता नाईक उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. एस. एन. खडपकर यांनी केले. आभार प्रा. आशिता नाईक यांनी मानले.